# ‘लोकसत्ता’मध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखमालेवरील ‘आयुर्वेदाच्या स्मृतीतून’ पुस्तकाचे प्रकाशन

**प्रतिनिधी, पुणे**

**‘लोकसत्ता’च्या ‘चतुरंग’** पुरवणीत प्रसिद्ध झालेल्या ‘आयुर्वेदाच्या स्मृतीतून’ या लेखमालेवरील याच नावाच्या पुस्तकाच्या दुसऱ्या भागाचे बुधवारी (१९ जुलै) प्रकाशन होणार आहे. ज्येष्ठ आयुर्वेदतज्ज्ञ वैद्य हरीश पाटणकर यांनी लिहिलेली ही लेखमाला लोकप्रिय ठरली होती.

‘केशायुर्वेद’ या केश परीक्षण प्रयोगशाळेच्या प्रथम वर्धापनदिनाच्या निमित्ताने ‘आरोग्यवर्धिनी चिकित्सालय’ व ‘बीव्हीजी इंडिया’ या संस्थांतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात बुधवारी सायंकाळी ४ ते ७ या वेळात टिळक स्मारक मंदिर येथे होणाऱ्या समारंभात या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार असल्याची माहिती केशायुर्वेद संस्थेचे संचालक वैद्य पाटणकर यांनी दिली. ‘केशायुर्वेद’च्या राज्यातील केंद्रांच्या प्रमुखांचे सत्कार व अरुणकुमार महाराज यांचे पारद किमया प्रयोग या कार्यक्रमांबरोबरच ‘असोसिएशन ऑफ आयुर्वेदिक कॉस्मेटॉलॉजी, ट्रायकॉलॉजी अँड टेक्नॉलॉजी’ची स्थापनाही या वेळी करण्यात येणार असल्याचेही आयोजकांनी कळवले आहे.

‘बीव्हीजी’चे अध्यक्ष हणमंतराव गायकवाड, आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. अरुण जामकर, आयुर्वेद व युनानी विद्या शाखेचे अधिष्ठाता डॉ. सतीश डुंबरे, राज्याच्या ‘आयुष’ विभागाच्या सहायक संचालिका डॉ. सरिता गायकवाड, ‘बुकगंगा इंटरनॅशनल’चे संस्थापक मंदार जोगळेकर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

आजीबाईच्या बटव्यातील आयुर्वेदाची वाचकांपर्यंत माहिती पोहोचवणे हा या लेखमालेचा उद्देश होता. या लेखमालेस वाचकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. त्यातील लेखांच्या पुस्तकरूपातील पहिल्या भागाचे प्रकाशन जुलै २०१६ मध्ये झाले होते.

लोकसत्ता Tue, 18 July 2017
epaper.loksatta.com//c/20635657